प्रलंबित रस्ते बांधकामांच्या गुणवत्तेमध्ये तडजोड करू नका :मुनगंटीवार

जिल्ह्यामधील रस्ते बांधकामांचा घेतेला आढावा

नियोजन भवन चंद्रपूर येथे काल सार्वजनिक बांधकाम विभागाची आढावा बैठक पार पडली. यावेळी जिल्ह्यातील प्रलंबित रस्त्याची कामे कोणतीही तडजोड न करता उच्च गुणवत्ता राखून करावी. विशेष म्हणजे गुणवत्तेबाबत कोणाच्याही दबावाला बळी न पडता सदर कामे वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी दिले. यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.
त्यासोबत मुल तालुक्यात विश्रामगृह, भाजी बाजार, आदिवासी वस्तीगृह, बायपास रोड, बस स्टँड, पोलीस उपविभागीय कार्यालयासाठी जागा, राजोली प्राथमिक आरोग्य केंद्र याबाबत आढावा घेवून कामे मार्गी लावण्यासाठी मुल उपविभागाची वेगळी आढावा बैठक घेण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांना दिल्या.
चंद्रपूर, मुल व बल्लारपुर व गोंडपिपरी शहरांसाठी आवश्यक बायपास रोड साठी जागानिश्चिती करावी. खाणक्षेत्रात जड वाहतुकीचे प्रमाण जास्त असलेल्या रस्त्यांची ओळख पटवून तेथे बायपास रस्ते प्रस्तावित करता येईल का याचा देखील अभ्यास करावा. तसेच घुग्गुस बायपास रस्त्याचा प्रलंबित प्रश्न देखील तातडीने निकाली काढण्याच्या सूचना दिल्या.
यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागातील रिक्त पदे, जिल्हानिहाय रस्त्याचा दर्जा व लांबीचा तपशील, खड्डे भरणे कामे, भांडवली खर्चातील मार्ग व पूलाची कामे, अर्थसंकल्पीय रस्ते व पुलाचे कामे, हायब्रिड ॲन्युटी अंतर्गत कामे, नाबार्डची कामे, नक्षलग्रस्त भागातील अंतर्गत रस्त्यांची कामे, पुरवणी अर्थसंकल्पातील रस्ते परिरक्षण व दुरुस्तीची कामे, इमारतीची कामे, नाविण्यपूर्ण कामे, वन अकॅडमी, महाकाली मंदिर परिसराचा विकास, सैनिकी शाळा, बॉटनिकाल गार्डन विसापुर, बांबु प्रशिक्षण व संशोधन केंद्र, चिचपल्ली सिकलसेल इमारत, जिल्हाधिकारी कार्यालयाचे बांधकाम याबाबत बैठकीत आढावा घेतला.